# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 07/11/2019 (गुरूवार)
# (सकाळ)

---

## खुन

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 11 कि. मी अंतरावर मोहगाव येथे दिनांक 03/11/2019 चे 20.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– अरुण शिवा हीरेखन, वय 56 वर्ष, रा. मोहगाव, ता. कुही यांच्या घराजवळ आरोपी नामे– संदीप दशरथ डोंगरे, वय 35 वर्ष, रा. मोहगाव ता. कुही हा त्या ठिकाणी आला. यानंतर आरोपीने बैल चोरून नेल्याच्या कारणातुन शिवीगाळ करण्यास सुरवात केली. दरम्यान अजाब वासुदेव सहारे, वय 49 वर्ष, रा. मोहगाव यांनी आरोपी यास शिवीगाळ करु नको असे म्हणुन समजाविले. यानंतर आरोपीने अजाब सहारे यांनाही शिवीगाळ व मारहाण करून त्यांना सीमेंट रोडवर ढकलले. यात अजब सहारे हे खाली पडल्यानंतर त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. त्यांना उपचाराकरीता मेडीकल कॉलेज, नागपुर येथे भरती केले असता त्यांचा मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 302 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री. गिते हे करीत आहे.

## जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीविरूद्ध

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 08 कि. मी अंतरावर जुनीकामठी गोंडगाव कन्हान येथे आरोपी क्र. 1) सौ सकुनबाई शिवा सहारे, 2) मोरेश्वर गेंदलाल मारबते व 3) कविता भगवान वयले सर्व रा. जुनीकामठी गोंडेगाव कन्हानयाचे विरुध्द जेएमएफसी कोर्ट कामठी येथे डपेब क्रिमी. अपील नं. 48/19 दि. 23.10.19 अन्वये फिर्यादी नामे– शिवा चिंधुजी सहारे, वय 45 वर्ष, रा. जुनीकामठी गोंडेगाव, कन्हान गुन्हे दाखल केले होते. दिनांक 23/04/2018 चे 19.30 वा. ते 20:00 वा. दरम्यान आरोपीतांनी फिर्यादीच्या जेवणामध्ये विष टाकुन जिवे मारण्याचा प्रयत्न केला. सदर अर्जावरुन मा. जेएमएफसी कोर्ट कामठी यांनी चौकशी करुन 156 (3) जाफौ अन्वये आरोपी क्रं 1 ते 3 यांचे विरुध्द कलम 30, 34 भादंवि अन्वये गुन्हा नोंद करुन कलम 173 जाफौ. अन्वये अंतीम अहवाल मा. जेएमएफसी कोर्ट कामठी यांचे जावक क्रं 836/19 दि. 05.11.19 अन्वये आदेश पो.स्टे आवक क्रं. 1756/19 दि. 06.11.19 प्राप्त झाल्याने सदरचा गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 307, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री. आत्राम हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर